**तक्रार (यु.एल.पी.) क्र.२१/२०२३.**
**नि.क्र.यु.डब्ल्यु—०२.**

**माझे नाव : श्री शिवाजी भिवा पिपरकर,**
**माझे वय : ६५ वर्षे, धंदा : शेती,**
**रा.पांढरेवाडी, ता.पंढरपूर, जि.सोलापूर.**

**<u>सरतपास तोंडी स्वरुपात तक्रारदारातर्फे श्री देशपांडे वकील यांचेमार्फत शपथेवर सुरु,</u>**

१. मला न्यायालयाचे साक्ष समन्स मिळाल्यावरुन मी पुरावा देण्यासाठी आलो आहे. मी वनविभागात वॉचमन म्हणून नोकरीला होतो. तक्रारदार शिवाजी विठठल राजगुरु यांना मी ओळखतो. ते देखील वनविभागात नोकरीला होते. तक्रारदार व मी दोघेही १९८२ साली नोकरीस लागलो होतो. तक्रारदाराने वनविभागात सलग नोकरी केली. तक्रारदाराने त्याला नोकरीत कायम करण्यासाठी वनविभागाच्या पुणे कार्यालयात अर्ज दिला होता. काम नाही असे त्याला विभागाने उत्तर दिले होते. १९९४ सालापर्यंत सेवेत ५ वर्षे सलग पूर्ण झाल्यावर नोकरीत कायम केले जाईल असे उत्तर विभागाने मला व तक्रारदार यांना दोघांनाही दिले होते. त्या पत्रासोबत असलेल्या यादीत आम्हा दोघांचीही नावे नव्हती. तक्रारदार वनविभागातून सेवानिवृत्त झाला आहे. सामनेवालाने तक्रारदारास नोकरीत कायम केले नव्हते. तक्रारदार सामनेवालाकडे सेवेत असताना विभागाचेच काम करत असे व ते कुठल्याही शासकीय योजनेवर काम करत नव्हते.

**<u>उलटतपास सामनेवालातर्फे श्रीमती चितापुरे वकील यांचेमार्फत सुरु,</u>**

२. मी सामनेवालाकडे १९८२ सालापासून कामास लागलो होतो हे दाखविणारा कागदोपत्री पुरावा माझेकडे आहे व तो मी दाखल करु शकतो. हे म्हणणे खरे नाही की मी वनविभागात रोजगार हमी योजनेअंतर्गत काम करत होतो. (यावेळी साक्षीदाराने यादी नि.क्र.ओ.७ सोबत दोन दस्त दाखल केले) आता मला मी यादी **<u>नि.क्र.ओ.७</u>** सोबत दाखल केलेले दि. ०९/०९/१९९८ रोजीचे पत्राची प्रत दाखविण्यात आली. हे खरे की त्या पत्रामध्ये मी १९८२ साली कामास लागलो असा उल्लेख नाही. त्या पत्रास उलटतपासणीकामी वापरल्याने **<u>नि.क्र. ओ.८</u>** देण्यात आली. हे म्हणणे खरे नाही की मी सामनेवालाकडे १९८९ साली कामास लागलो होतो. हे खरे की २००१ साली सामनेवालाने वरिष्ठांकडे कामगारांची सेवाज्येष्ठता यादी समाविष्ट असणारा प्रस्ताव पाठविला होता. हे खरे की त्या प्रस्तावासोबतच्या यादीमध्ये अ.क्र. ६६ वर माझे नाव होते. हे खरे की त्या यादीमध्ये माझी कामास लागल्याची तारीख

दि.०१/११/१९८९ अशी नमूद होती. स्वतःहून सांगतो की मी १९८२ साली कामास लागलो होतो. हे खरे की २००१ सालापासून मी कामावर नसल्याचा उल्लेख त्या यादीमध्ये आहे. सामनेवालाच्या वकीलांनी ती यादी **<u>नि.क्र.सी.४</u>** सोबत दाखल केली. त्या यादीस ओळखीची खूण म्हणून **<u>आर्टीकल क</u>** देण्यात आली. स्वतःहून सांगतो की मला सांगोला येथे बदली देण्यात आली होती व २०१३ साली मला सेवेत कायम करण्यात आले होते. त्याबाबतीत कागदोपत्री पुरावा माझेकडे आहे व तो मी **<u>नि.क्र.ओ.७</u>** सोबत दाखल केले आहे. त्या संदर्भातील आदेशास **<u>नि.क्र.ओ.९</u>** देण्यात आली. हे खरे की १९८२ साली मी रोजंदारी मजूर म्हणून कामास लागलो होतो व उपलब्धतेनुसार मला काम व कामाचा मोबदला देण्यात येत असे. हे खरे की मला रोजगार हमी योजनेखाली त्यावेळी रु.५/— रोज मिळत असे. हे खरे की १९८२ ते १९९१ साला दरम्यानच्या कालावधीत माझे दरवर्षी कामाचे २४० दिवस न भरल्याने मला नोकरीत त्यावेळी कायम करण्यात आले नव्हते. पुन्हा सांगतो की कामाचे २४० दिवस भरले होते मात्र मी रोजगार हमी योजनेतंर्गत कामास होतो त्यामुळे मला कायमपणाचे फायदे देता येत नाही असे त्यावेळी सांगण्यात आले होते. हे खरे की १९८९ सालानंतरच्या कालावधीत ५ वर्षासाठी माझे दरवर्षी कामाचे २४० दिवस भरल्याने माझे नावाचा प्रस्ताव कायमपणासाठी पाठविण्यात आला होता व त्यानंतर मला कायमपणाचे फायदे देण्यात आले होते. तक्रारदार हा सामनेवालाकडे रोजगार हमी योजनेवरच कामास होता व त्यामुळे त्याला कायमपणाचे फायदे देण्याचा प्रस्ताव सामनेवालाने शासनाकडे पाठविला नव्हता ते मला माहित नाही. हे खरे की तक्रारदाराने वयाची ६० वर्षे पूर्ण केल्यावरुन २००० त्याला कामावरुन कमी करण्यात आले. हे म्हणणे खरे नाही की तक्रारदाराची व माझी मैत्री आहे व त्यामुळे मी आज त्याचे बाजूने त्याचे सांगण्यावरुन खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपासणी पूर्ण.**

**फेरतपासणी काही नाही.**

**श्रवणोत्तर स्विकृत**

PRASHANT PRABHAKAR RAJVAIDYA
Digitally signed by PRASHANT PRABHAKAR RAJVAIDYA
Date: 2024.07.05 16:59:25 +0530

( प्र. प्र. राजवैद्य )
सदस्य,
औद्योगिक न्यायालय, सोलापूर.

सोलापूर.
दिनांक :— ०५/०७/२०२४.

*माकम/—*